# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग / घटक | नांदेड |
| 2 | पोलीस स्टेशन | पो.स्टे. उमरी जि. नांदेड |
| 3 | गुरनं व कलम | पो.स्टे. उमरी गु.र.नं. 09/2026 क. 7,7 A 12 भ्र.प्र.अ. 1988 |
| 4 | तक्रारदार | पुरुष, वय 48 वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | 1) साईनाथ किशन कांचणे, वय 44 वर्षे वरिष्ठ तंत्रज्ञ (गट क), नेमणूक महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी, शाखा करखेली ता.धर्माबाद जि.नांदेड.<br>2) कपिल माधव देवके, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती व खाजगी इलेक्ट्रिशियन, रा.धानोरा ता.उमरी जि.नांदेड (खाजगी इसम) |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक 21.01.2026 ते 22.01.2026 दरम्याण 11.24 ते 12.50 वाजता धानोरा उमरी येथे |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक 22/01/2026 चे 20.30 वाजता |
| 8 | मागणी केलेली रक्कम | 4500/- रुपये |
| 9 | स्विकारलेली रक्कम | 3000/- रुपये |
| 10 | **थोडक्यात माहिती** :- दिनांक 20/01/2026 रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, दिनांक 16/01/2026 रोजी तक्रारदार यांचे विहिरीवरील लाईटचे कनेक्शन लाईनमॅन कांचणे व खाजगी इसम कपिल यांनी कट केले होती. त्यानंतर तक्रारदार हे लाईनमॅन कांचने यांना भेटले असता, त्यांनी कट केलेले कनेक्शन परत जोडण्यासाठी खाजगी इसम कपिलला भेटण्यास सांगितले. तक्रारदार हे खाजगी इसम कपिल यांना भेटले. तेव्हा कपिल यांनी सांगितले की कट केलेले कनेक्शन परत जोडायचे असेल तर तुम्हाला 4500/- रुपये द्यावे लागतील असे कांचने साहेबांनी सांगितले आहे. तुम्ही पैसे दिल्यानंतर मी तुम्हाला कनेक्शन जोडून देतो असे म्हणून 4500/- रुपये लाचेची मागणी केली होती.<br>दिनांक 21/01/2026 रोजी तक्रारदार यांनी त्यांचे गाव बाचेगाव येथे लाईनमॅन कांचने यांची भेट घेतली. लाईनमॅन कांचने यांनी लाईट कनेक्शन परत जोडून देण्यासाठी 4500/- रुपयाची मागणी करून तडजोडीअंती 3000/- रुपये खाजगी इसम कपिल यांच्याकडे देण्यास सांगितले.<br>दिनांक 22/01/2026 रोजी धानोरा येथे तक्रारदार यांनी खाजगी इसम कपिल यांची भेट घेतली. खाजगी इसम कपिल यांनी लाईनमॅन कांचने यांनी विहिरीवर कनेक्शन देण्यासाठी तुमच्याकडून 3000/- रुपये घ्यायला सांगितले आहे, तुम्ही कांचने साहेबाचे पैसे माझ्या कडे द्या असे म्हणून लाच देण्यास प्रोत्साहन देऊन 3000/- रुपये लाचेची रक्कम लाईन मॅन कांचने यांच्यासाठी व स्वतः साठी स्वीकारताना रंगेहाथ मिळून आला आहे. म्हणुन पोस्टे उमरी येथे गुन्हा दाखल करण्यात आला. | |

सदरची सापळा कारवाई मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेड चे पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार, पोलीस निरीक्षक प्रिती जाधव व नांदेड युनिट पथक यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील कमांकावर संपर्क करावा.

**१) संदीप पालवे, पोलीस अधीक्षक** — ०२४६२ — २५५८११, मो.नं. ९२२६४८४६९९
**२) श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक** — ०२४६२ — २५५८११
**३) श्री प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक** — मो.नं. ९३५९०५६८४०.
**४) टोल फ्रि** — १०६४
**५) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी कमांक** — ०२४६२ — २५३५१२
**६) Website** — www.acbmaharashtra.gov.in
**७) Mobile App** — www.acbmaharashtra.net
**८) Facebook Page** — www.facebook.com/maharashtraACB
**९) Twitter** — @ACBnanded
**१०) Instagram** — acb_nanded
**११) Youtube Cahnnel** — @AntiCorruptionBureauNanded
**१२) whats App number** — ८९५६५०१०६४

कार्यालय, पोलीस उप अधीक्षक * ला.प्र.विभाग, नांदेड युनिट

**पोलीस उपअधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड**